# वसई विरार शहर महानगरपालिका

## मा. स्थायी समिती सभा दिनांक २५/०१/२०१६

## सकाळी ११.३० वा.

| अ. क्र. | विषयाचे नाव | मा. स्थायी समिती सभेचा निर्णय |
|---|---|---|
| १ | मागील मा. स्थायी समिती सभा दि. ११/०१/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणे. | **ठराव :-** मागील मा. स्थायी समिती सभा दि. ११/०१/२०१६ रोजीचे इतिवृत्त कायम करणेत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्रीम. कांता पाटील सूचक :- मा.श्री. श्री. अब्दुल हक पटेल<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| २ | वसई-विरार शहर महानगरपालिका आस्थापनेवरील अभियांत्रिकी, लेखा व लेखा परिक्षण, आस्थापना, आरोग्य सेवा, सामान्य प्रशासन इ. विभागातील अधिकारी व कर्मचारी यांना अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचेकडुन प्रशिक्षण देणेबाबत. | **ठराव :-** विभागीय नागरी आणि पर्यावरण संशोधन केंद्र, अखिल भारतीय स्थानिक स्वराज्य संस्था, मुंबई यांचेकडून महानगरपालिकेच्या अधिकारी/कर्मचारी यांना द्यावयाच्या प्रशिक्षण कार्यक्रमासाठी ही स्थायी समिती प्रशासकीय मंजूरी तसेच रू. ९,५१,५८५/- (अक्षरी रू. नऊ लाख, एकावन्न हजार, पाचशे पंच्याऐंशी मात्र) इतक्या खर्चास वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. चंद्रकात गोरीवले सूचक :- मा.श्री. प्रकाश रॉड्रीक्स<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ३ | मकर संक्राती निमित्त महिलांसाठी मार्गदर्शन मेळावा व तिळगुळ वाटप समारंभ आयोजित करणेकामी प्रशासकीय व वित्तीय मंजुरी मिळणेबाबत. | **ठराव :-** याकामी सर्व प्रभाग समितीमार्फत कार्यक्रमाचे आयोजन करण्यांत यावे. महिला व बालकल्याण विभागामार्फत महानगरपालिका हद्दीत नोंदणीकृत असलेल्या बचत गटाच्या महिलांनी उत्पादित केलेल्या प्रभागनिहाय बचत गटाकडून दरपत्रके मागवून तिळाचे लाडू, फुटाने, फुले इत्यादी साहित्य खरेदी करणेकामी येणाऱ्या एका प्रभाग समिती करीता अंदाजे १,५०,०००/- रू. याप्रमाणे नऊ प्रभाग समितीसाठी येणाऱ्या अंदाजे १३,५०,०००/- खर्चास ही सभा प्रशासकीय व वित्तीय मंजूरी देत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री. किशोर पाटील सूचक :- मा.श्री. प्रशांत राऊत<br>ठराव सर्वानुमते मंजूर |
| ४ | प्रभाग समिती जी, वॉर्ड नं. ६३ (९०) मध्ये सातिवली कुवरापाडा येथे हनुमंत नगर शाळेमागे १२ सीटचे शौचालय बांधणे कामी मंजूर निविदाधारकाबरोबर संविदा करणेस मान्यता देणे. | **ठराव :-** उपरोक्त निविदांची तुलना करता कमीत कमी दराची मे. सरस्वती एंटरप्रायजेस यांची ३.००% जास्त दराची निविदा प्राप्त झालेली आहे. सदरची निविदा मुख्य लेखा अधिकारी व मुख्य लेखापरिक्षक यांनी तपासून मंजूरीची शिफारस केली आहे. तरी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनिय १९४९ चे कलम ७३ (क) नुसार मे. सरस्वती एंटरप्रायजेस यांच्याशी कामाची संविदा करण्यास मान्यता देणेंत येत असून सदर कामी निविदा दराने येणाऱ्या खर्चानुसार अंतीम प्रशासकीय व वित्तीय मान्यता देण्यांत येत आहे.<br>अनुमोदक :- मा.श्री.मिलिंद घरत सूचक :- मा.श्रीम. मनिषा जाधव<br>ठराव सर्वानुमते मंजूर |